# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र-३४८/२०२४** **दिनांक-११/०९/२०२४.**

## “गाळयाचे शटर तोडुन चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश”

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. २४/०८/२०२४ रोजी १९.३० वा. ते दि. २५/०८/२०२४ रोजी ०५.३० वा.चे दरम्यान फिर्यादी गोविंद नारायणण पांडे, वय ४० वर्ष, यांच्या धुमाळ नगर, वसई पुर्व ता. वसई जि. पालघर येथील दुकान गाळयाचे लोखंडी पत्र्याचे शटर कोणीतरी अज्ञात आरोपीने उचकटवुन त्यावाटे आत प्रवेश करुन दुकानाच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवलेले ५,००,००० /- रुपये रोख रक्कम व गाळयाच्या आतमध्ये उभी करुन ठेवलेली होंन्डा कंपनीची ॲक्टीव्हा दुचाकी मोटार सायकल फिर्यादी यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने घरफोडी चोरी करुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपी विरुध्द गु.र.क्र. I ६६८/२०२४ भा.न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ), ३३१(३), ३३१(४), ३(५) प्रमाणे दिनांक २५/०८/२०२४ रोजी ९.०८ वा. गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी अंमलदार यांचे वेगवेगळे ०४ पथके तयार करुन गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने सुचना दिल्या. सदर सुचनानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन सदर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासुन आरोपीत यांनी गुन्हा करण्याकरीता वापरलेल्या रिक्षाचा व आरोपीत यांचा सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातुन घटनास्थळ ते भाईंदर पश्चिम असे सुमारे १५० सीसीटीव्ही फुटेज तपासुन आरोपीत यांचा गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेऊन आरोपीत १) रोहित रमेश चव्हाण, वय २१ वर्षे, रा. भाईंदर जि. ठाणे, २) अनिल श्री पाल, वय २२ वर्षे, भाईदर ता.जि. ठाणे,३) विश्वनाथ विरेंद्र यादव, वय २८ वर्षे, भाईदर जि. ठाणे यांना अटक करुन त्यांच्याकडुन २,१०,४०० रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. तसेच आरोपीत यांच्याकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

१) पेल्हार पोलीस ठाणे गु.र.क्र. I ६६८/२०२४ भा.न्याय सहिता २०२३ चे कलम ३०५ (अ), ३३१(३), ३३१(४), ३(५) प्रमाणे.( मुळ गुन्हा )
२) पेल्हार पोलीस ठाणे गु.र.क्र. I ६७१/२०२४ भा.न्या.संहिता कलम ३०५ (ए), ३३१ (४) प्रमाणे.

अटक आरोपीत क्र. ०१ हा सराईत असुन त्यांच्या विरोधात खालील प्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

१. नवघर पोलीस ठाणे गु.र.क्र. ८४६/२०२२ भादविस कलम ३८०, ४५७ प्रमाणे.
२. नवघर पोलीस ठाणे गु.र.क्र. ०३/२०२२ भादविस कलम ३८० प्रमाणे.
३. नवघर पोलीस ठाणे गु.र.क्र. ७६८/२०२१ भादविस कलम ३८०, ४५४,४५७ प्रमाणे.
४. मिरारोड पोलीस ठाणे गु.र.क्र. ४६४/२०२२ भादविस कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे.
५. वसई रोड रेल्वे पोलीस ठाणे गु.र.क्र. २९०/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रेय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश

देशमुख, तानाजी चव्हाण, वाल्मिक पाटील, मिथुन मोहिते, पो.अं.रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखील मंडलिक, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजीत नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, सर्व नेम.पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा/नामदेव ढोणे, पो.अं. सोहेल शेख नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.



-----------ooooo----------